# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४००००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ २२६१७९६९ फॅक्स नं.२२६९०००७

तार- EDUTECH E_mail nbpatil@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


क्रमांक :- ३/तंशिसं/अल्प.गुनिसा/२००९/23
दिनांक :- 13/2/09

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय / अनुदानित तंत्रनिकेतने,
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

विषय :- **राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उमेदवाराकरिता राज्याभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत**

संदर्भ :- शासन निर्णय, अल्पसंख्याक विभाग, क्र. अविवि-२००९/ प्र.क्र.४६/०९/का.१, दि. ५.२.२००९

वरील संदर्भिय शासन निर्णयाची प्रत या संचालनालयाच्या www.dte.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाची download प्रत करुन घेण्यात यावी.

सदर शासन निर्णयाअन्वये तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये यामधून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या मान्यतेने निरंतर प्रशिक्षण योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या विविध अभ्यासक्रम तसेच तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ व मुक्त विद्यापीठे यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजना जाहिर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सन २००८-०९ मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या सुमारे ५००० विद्यार्थ्यांना रु. ४,०००/- इतके प्रशिक्षण शुल्काची रक्कम अदा करण्यात येईल. आपल्या संस्थेमध्ये अशा प्रकारे चालविण्यात येणा-या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज दि. २६.२.२००९ पर्यंत विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात यावेत व सदर अर्जाची छाननी करुन आवश्यक त्या कागदपत्रासह दि.२.३.२००९ पर्यंत या संचालनालयास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सदर कामासाठी एक जबाबदार अधिका-यांची नेमणूक करण्यात यावी. आपल्या संस्थेत शिकत असलेल्या मुस्लिम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख व पारसी समाजातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ करुन देण्यात यावा. सदर योजना उत्कृष्टपणे राबविण्याचे आदेश मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग यांनी दिलेले आहेत. त्यामुळे सदर योजना अत्यंत प्रभावीपणे राबविण्याचे प्रयत्न करावेत, ही विनंती.

13/2

**( ए. सी. अत्तार )**
प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत - सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी